MHSN090004902023

**नियमित दिवाणी दावा क्र. ६४/२०२३ मधील नि.क्र.१६ खालील आदेश.**

**(०१).** प्रस्तुत प्रतिवादीने सदरचा अर्ज त्याचेविरुध्द 'नि.क्र.५ चे ताकिद अर्जाला म्हणणे नाही' असा झालेला आदेश बाजूला सारुन/रद्द होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे कथन असे की, प्रस्तुत दाव्याची नोटीस मिळाल्यानंतर ते याकामी हजर झाले आहेत. परंतु, ताकिदी अर्जाचे कामी महत्वाची असणारी माहिती व कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने प्रतिवादी यांना याकामी वेळेत नि.क्र. ५ चे ताकिद अर्जास म्हणणे दाखल करता आले नाही.

**(०२).** सदर अर्जावर वादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे दिले असुन, वादीचा अर्ज व त्यातील कथन मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**(०३).** अभिलेख पाहिले. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द जाहीर ठराव व ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी यांना नि.क्र. ५ ला म्हणणे दाखल करणेकरीता २२ दिवसाचा विलंब झाल्याचे दिसुन येते.

तथापि, सदर ताकिद अर्जाचा गुणदोषावर न्यायनिर्णय होणेकरीता प्रतिवादी यांचे म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**०१.** प्रतिवादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादीविरुध्द 'नि.क्र. ५ चे ताकिद अर्जास म्हणणे नाही' असा झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

RITA SHESHRAO KULKARNI
Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2023.09.07 17:27:51 +0530

**तासगांव** (डॉ.आर.एस.कुळकर्णी)

दिनांक : ०७ सप्टेंबर २०२३. सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, **तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – ०७ सप्टेंबर २०२३.

न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक – ०७ सप्टेंबर २०२३.

आदेश अपलोड दिनांक– ०७ सप्टेंबर २०२३.